**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, क्रॉफर्ड मार्केट जवळ,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दुरध्वनी क्रमांक:- २२६१ ४००३ email-wssd.ws०२@gov.in

---

क्र.कंत्राटी २०२४/प्र.क्र.४७/पापु ०२ दिनांक : ०९फेब्रुवारी, २०२४.

प्रति,
सचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**विषय :- करार पद्धतीने विभागात Pantry सुरु करण्याबाबत...**

महोदय ,

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ७या मजला, जी.टी. हॉस्पिटल इमारत संकुल येथे बैठकीकरिता आलेल्या अभ्यंगतांची व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या चहापान - अल्पोपहार या करिता निविदा प्रक्रिया राबवून विभागातील जागेत pantry सेवा सुरू करणेबाबत सेवा पुरवठादारांकडून मागविण्यात येणाऱ्या निविदेची नोटीस अटी व शर्तीसह, तात्रिक दरपत्रक नमुना शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(वीरेंद्र वाघमारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : अटी व शर्ती

# अटी व शर्ती

I.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २६ मे, २०१७ अन्वये निश्चित केलेल्या किमतीच्या मर्यादेच्या १०% वाढ गृहीत धरून चहापान - अल्पोपहार यांचे दर निश्चित करण्यात येतील.

II.सार्वजनिक बांधकाम विभाग वेळोवेळी निश्चित करेल त्याप्रमाणे pantry जागेचे भाडे , वीज , पाणी इ .बिलांची अदायगी पुरवठादाराने करावी. त्यानुषंगाने निवड करण्यात आलेल्या पुरवठादाराने pantry सुरु करण्यापूर्वी रु. १५०००/- रक्कम विभागाकडे अनामत ठेवावी.

III. a) महाराष्ट दुकाने व आस्थापना ( नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन ) आधिनियम नुसार .

b) अन्न व औषधी प्रशासन विभागाकडून तसेच c) बृहन मुंबई महानगरपालिका या कार्यालयांकडून अग्नी सुरक्षा व इतर आवश्यक परवाने पुरवठादाराने pantry सुरु करण्यापूर्वी प्राप्त करून घ्यावे.

IV. पोलीस सुरक्षाविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच pantry मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची पोलीस तपासणी झालेली असावी.

V. pantry मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशील या विभागाला उपलब्ध करावा .

VI. pantry मध्ये अग्नी सुरक्षा विषयक नियमांचे पालन करावे.

VII.कामगार अधिनियमातील ज्या तरतुदी विहित केल्या आहेत त्यांचे पालन, पुरवठादाराने करावे.

VIII.कराराच्या कालावधीमध्ये आवश्यक अति व शर्ती अंतर्भूत करण्याचा अधिकार विभागाकडे असेल.

IX. कराराचे पालन समाधानकारक न झाल्यास करार केव्हाही संपुष्ठात आणणे तसेच कराराची मुदत वाढविणे या बाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार विभागाकडे असेल.

**************************************************************************************************